# राशिभविष्य - जून, २०१५.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

=============================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सर्व दृष्टीनी प्रतिकूल असाच असणार आहे. त्यामुळे मनस्ताप करून घेण्यापेक्षा लहरी स्वभावावर, मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून संयम व सहनशील बनूनच विपरीत काळाशी मिकाब्ला केला पाहिजे. या राशीच्या अष्टम स्थानीअसलेला शनि ग्रह अपेक्षाभंग करणारा, मानहानी करणारा, मनस्ताप देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे सर्व प्रकारच्या अनारोग्याला निमंत्रण देणारा असल्याचा अनुभव येईल. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना अधिक प्रमाणात घडण्याची शक्यता दिसते आर्थिक जबाबदाऱ्या त्रस्त करतील. फसवणुकीमुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार होणे संभवते. जपा. शिवाय विविध कारणांनी आप्तेष्ट मंडळीशी वाद, भांडणे होणेही शक्य दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. त्यामुळे महत्वाकांक्षा वाढेल. पण सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. कारण कळत न कळत दुखापत, इजा होण्याची शक्यता दिसते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण नातेवाईक मंडळीकडून त्रास गोन्याची शक्यता आहे. जपा. शेतीवाडी असणाऱ्या या राशीच्या मंडळीना काळ लाभदायक होईल. सुसंगती लाभेल. काहींचे कौतुकही होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना काळ लाभदायक होईल. मात्र कुमार्गी मित्रांपासून दूर राहणेच हिताचे होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ** - या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीनी मन व विचारशक्ती अत्यंत स्थिर व शांत राखण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम. कारण या महिन्याच्या काळात बुद्धी विकृत होणे संभवते. काहीना कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. अकारण संताप व्यक्त केलात तर केवळ अकारण दगदग होणे, शारीरिक उष्णता भडकणे, त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. हट्टी स्वभावाला मुरड घाला. उद्धटपणे वागू नका. घरीदारी सर्व ठिकाणी नम्रतेचे आचरण करा हृदयविकार, रक्तदाब असणारांनी तर विशेषच काळजी घेतली पाहिजे. आर्थिक हानी, फसवणूक होणार नाही याची काळजी

घ्या. आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिता त्रस्त करील. जपा. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. तसेच भावंडाकडून त्रास होणे संभवते. जुगाराचा नाद असेल तर आर्थिक नुकसानीत भरच पडेल. या राशीच्या ज्या मंडळीना सहज वाममार्ग धन मिळण्याची शक्यता असेल त्यांनी तो नादकटाक्षाने सोडावा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. अशा या मनस्ताप देणाऱ्या काळात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्याअनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कौटुंबिक सुख समाधान मिळेल. काहीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होण्याची शक्यताहीदिसते. तसेच काहींना मानाचे स्थान मिळणे संभवते. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लेखकवर्गाचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. मानसिक रोगतज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धेनेकुलदैवताची उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. गैर समजुतीने भांडणे होणे संभवते. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. मानहानी होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात स्वभाव संतापी, हट्टी , उद्धट होणे संभवते. त्याला लगाम घाला. तरच सुखाचे होईल. राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या युवकांनीहातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. गुरु-शुक्र -हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शत्रू राशीतील शनि ग्रहअन्य प्रकारच्या नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. अध्यात्मासाठी मात्र काळ अनुकुल आहे. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती साधणे शक्य होईल. काहीना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळणे संभवते. पण अशा प्रतिकुलकाळातही गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक जीवनात मधून मधून काही शुभ व मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच काही आर्थिक लाभ होणेही संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक प्रगतीस गुरु-शुक्र

पूरक ठरतील. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, अर्थलाभ असे काही मिळू शकेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. आरोग्य सुधारेल. सामान्य नोकरदार मंडळीना कष्टानेच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, तसेच लेखन व्यवसाय असणारांना , संशोधन क्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मनसोक्त आनंदात महिन्याचा पूर्वार्ध व्यतीत होईल. पण उत्तरार्धात परिस्थिती बदलण्याची शक्यता दिसते. सतत मनाविरुद्ध घटना घडतील. त्यामुळे मन अस्वस्थ राहील. मंगळ ग्रह अधिक प्रमाणात प्रतिकुल होणार असल्यामुळे खर्च , चिंता, भांडणे, जुन्या दबलेल्या प्रकरणाचा त्रास अशा प्रकारच्या घटनानी त्रस्त व्हाल. बंधुसुखात बाधा येणे संभवते. काहीना कायदेशीर बाबीना तोंड द्यावे लागेल. संततिविषयक समस्या त्रस्त करतील. पण कोळसा, लोखंड व्यापारी, चिकित्सक बौद्धिक क्षेत्र , वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. दूरच्या प्रवासाचे योग येतील. काहीना परदेशवारीची संधी मिळणेही शक्य दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे जलभय, विषभय आहे. जपा. ढोंगी आचरण अंगाशी येईल. जपा. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकूल होईल; पण कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कौटुंबिक कलह, भांडणे, आर्थिक समस्या, सहन करावे लागणारे कष्ट, श्रम , दगदग यांमुळे त्रस्त व्हाल. काहीना मातेच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील; तर काहीचे मातेशी पटणार नाही. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. मन:शांतीसाठी अध्यात्मात मन रामवा. त्यासाठी काळ अनुकूल होईल. सामाजिक कार्याची आवड असणाराना त्यांनी हाती घेतलेल्या कार्यात यश येईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात अडचणी, अडथळे येणे संभवते. शिवाय अपघात भय आहेच. जीवनसाथीस काही कारणाने नैराश्य आल्यामुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील आनंद मिळणे कठीण दिसते. जपा. या राशीच्या काहीना त्वचारोग, मुख दन्त रोग, रक्तविकार

अशापैकी आजारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ लाभदायक होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. बढती, पगारवाढ असे काही मिळणे शक्य दिसते. काही भाग्यवान मंडळीना उच्च पद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारानाही काळ अनुकूल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने शिवोपासना करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना तुलनात्मक दृष्ट्या या महिन्याचा पूर्वार्ध अधिक मनस्तापदायक जाण्याची शक्यता दिसते. नोकरीत विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. त्यामुळे मानसिक ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. घरी वडीलधाऱ्या मंडळीचा विरोध सहन करावा लागेल. शिवाय भावंडचिंता त्रस्त कारीलसे दिसते. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होण्याची शक्यता दिसते. पण महिन्याचा उत्तरार्ध पूर्णपणे अनुकुल होईल. अपेक्षित संततिसुख मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. परीक्षेत अपेक्षित यश मिळेल. विवाहेच्छू युवतींनाविवाह योग संभवतो. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. काहीना वाहनसुख तर काहीना ऐषारामसाधने प्राप्त होतील. अपेक्षित धनलाभ होईल. नवे मित्र मिळतील. काहीना उत्तम नोकरी मिळेल; तर काहीना अपेक्षित कार्यक्षेत्र मिळेल. आरोग्यदृष्ट्या वातविकाराचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची चिंता त्रस्त करील काहीना काल्पनिक चिंता त्रस्त करील. काहीना फसवनुकीचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. मन अस्थिर राहील. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश येणे संभवते. जीवनसाथीचा लहरी स्वभाव, पतीपत्नी भांडणे यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. मन:शांतीसाठी श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीची मंडळी जानेवारी २६, २०१७ पासून शनी ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होणार आहेत. आता थोडाच प्रतिकुल काळ बाकी आहे. तोपर्यंत धीर धरा. मन व

बुद्धी शांत व स्थिर ठेवा. उगीच नवीन उलाढाल्या करू नका. शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील याकडे विशेष लक्ष द्या. सध्या या राशीच्या मंडळीना डोकेदुखी, मेंदूविकार, मुदतीचा ताप येणे अशा प्रकारचे आजार होणे संभवते. जपा. काहीना पोटविकार, मूत्राशयविकार , अपचन असे आजार होणे संभवते. काहीना मूळव्याध, अन्य उष्णता विकार यांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय अपघात भय आहेच. वीज, पाणी यापासून जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. कलात्मक उद्योग-व्यवसाय असणारांना त्यांच्या व्यवसायात अडचणीना तोंड द्यावे लागेल. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व सुखकारक होईल. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती व सात्विक मन:शांती लाभू शकेल. या राशीच्या युवकांना अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. राहूमुळे अर्थलाभ व परदेशगमन संधी मिळणे संभवते. पण शत्रुराशीतील शनी ग्रहामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जीवनसाथीचे व संततीचे अनारोग्याची समस्या त्रस्त करील. जपा. सहनशील व्हा. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमाने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या व कुबातील सदस्यांच्या अनारोग्यकारक समस्यांशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. या राशीच्या काही मंडळीना पोटाचे आजार किंवा मूत्रविकार त्रस्त करतील. काहीना उष्णता विकार, मूळव्याध अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. संततीच्या अनारोग्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. अपघात भय आहे. जपा. वीज, पाणी यापासून जपा. वैवाहिक जीवनात गैरसमज, भांडणे, मतभेद, दोघांपैकी कोणाचे विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी सुख समाधान मिळणे कठीण दिसते. नोकरीत अधिकार पद असले तरी अधिकारपदाचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अंगाशी येईल. जपा. कुटुंबातील सदस्यामध्ये काही कारणाने दुरावा निर्माण झाल्यास असह्य मानसिक त्रास होणे संभवते. गुरु-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना सहज प्रगती करणे शक्य होईल. तसेच कलाकार मंडळीना कला विषकारास काळ अनुकूल होईल. काहीना अंतर्ज्ञान प्राप्त होईल तर काहीना

कल्पनाशक्तीच्या जोरावर साहित्यनिर्मिती करणे शक्य होईल. सद्‌गुण अंगी मुरतील. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्‌वारे आध्यात्मिक प्रगती साधेणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. काहीना थोरामोठ्‌याची कृपा प्राप्त होईल. काहीना आंतरिक गुणांमुळे प्रसिद्धी मिळणेही संभवते. काहीना गुरुकृपा प्राप्त होणेही शक्य दिसते. श्रद्धेने नियमितपणे श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना करा.

**(९) धनु -** शनि ग्रहाचा साडेसाती काळ चालू असल्यानेया राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेने सर्व व्यवहार करावेत. मन शांत व बुद्धी स्थिर ठेवून आचरण करावे. नपेक्षा मानहानी होणे संभवते. जपा. असह्‌य मनस्ताप झाल्यास अनारोग्य होणेही संभवते. सध्या मानसिक अस्वस्थता असल्याने कोणाशी पटणार नाही. त्यामुळे वास्तुसुखही मिळणे कठीण होईल. परिस्थिती कशीहीअसो, सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. जपा. आहे त्यात सुखसमाधानाने राहिलात तर खूपच बरे होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना व सर्व व्यावसायिकाना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. तेव्हा जे काय साधावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू अनुकुल होईल. महिन्याच्या उतरार्धात वैवाहिक जीवन कटकटीचे होणे संभवते. त्यामुळे अनारोग्य होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. काहीना पोटविकार तर काहीना मूत्राशय विकार त्रस्त करण्याची शक्यता आहे. काहीना रक्तविकार, ताप येणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. काहीना अपप्रचाराचा असह्‌य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. चोरी, फसवणूक यामुळे अर्थहानी होऊ शकेल. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांमी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. अशा विपरीत काळातही या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची तर काहीना जलप्रवासाची संधी मिळू शकेल. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या आही भाग्यवंत मंडळीना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. काहीना भूमिलाभ तर काहीना मान-प्रतिष्ठा प्राप्त होणेही शक्य दिसते. श्रद्धेने श्रीगुरु देव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव येतील असे वाटते. गुरु-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना

काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. गुरु-शनि शुभ योगामुळे लोखंड, कोळसा व्यापारी, वकिली - सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना, औषध विक्रेत्यांना , यांत्रिकतांत्रिक उद्योग-व्यवसाय असणारानाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलण्याची शक्यता दिसते. काहीना उष्णताविकाराचा त्रास , ताप येणे, इजा होणे अशापैकी आजार होणे संभवते. रक्तविकार, रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूचे विवाह जमतील व संपन्न होतील. जुने स्नेहसबंध घटट होतील. काहींचे नवे प्रेमसंबंध निर्माण होतील. पण काहीना कुसंगतीचा त्रास होणेही शक्य दिसते. जपा. मुलांच्या विविध समस्या त्रस्त करतील व त्यामुळे अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. जपा. या राशीच्या काही भाग्यवंताना परदेशगमनाची संधी मिळेल. आध्यात्मिक उपासनेद्वारे मानव बुद्धी शांत व स्थिर राहू शकेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(११) कुंभ - सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अतिशय कोमल झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे शीघ्र मानसिक संवेदना होत असतील व लगेच नैराश्य येत असेल. शिवाय स्वभावही अत्यंत अस्थिरहोणे संभवते. त्यामुळे अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण होणे, धारदार, फटकळ बोलणे होत असावे, असे वाटते. आर्थिक चिंता त्रस्त करीत असावी, असेही वाटते. खरेच असे घडत असेल तर सांगावेसे वाटते की वर्तमान काळ आपल्या राशीच्या मंडळीना फारसा अनुकुल नाही. म्हणून मन व विचारशक्ती शांत ठेवा, अकारण उलाढाल्या करू नका. कौटुंबिक सुख व गृहसौख्य यास सध्याचा काळ अनुकुल नाही. घरगुती कटकटी, भांडणतंटे, असमाधानकारक घटना, राहती जागा किंवा स्थावर संबंधी वाद, वाढता खर्चअशापैकी विविध कारणांनी मनस्ताप होणे संभवते. जपा. आपली उच्चति बौद्धिक राशी आहे. नम्रतेने आचरण करून , मौन व्रत धारण करून प्रतिकुल काळ व्यतीत करा. नंतर सर्व काही सुखाचेच होईल. महिन्याच्या उत्तरार्धात संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. कोणाचे विचित्र तापदायक आचरण, कोणाचे अनारोग्य अशापैकी घटनांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. प्रिय जनांपासून दुरावा होणेही

संभवते. त्यामुळे अस्वस्थ व्हाल. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नोकरदार मंडळीना काळ प्रतिकुल आहे. अशा परिस्थितीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. पण चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली सल्लागारी व्यवसाय, लोखंड, कोळसा व्यापारी अशांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मन:शक्तीसाठी आध्यात्मिक उपासना करा. कुलदैवताची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. त्यामुळे हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी घडेल. पण त्यासाठी स्वभावावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे कारण स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होण्याची शक्यता दिसते. कोणाचा धाक वा दडपण सहन होणार नाही. त्यामुळे स्वभावावर नियंत्रण ठेवू शकलात तर सर सुखाचेच घडेल. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तर महिन्याचा पूर्वार्ध अधिकच लाभदायक होईल. नोकरीत वरिष्ठ कौतुक करतील. काहीना बढती, मानाचे स्थान, उच्च पद असे काही मिळू शकेल. प्रवास योग येईल. पण दुखापत होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुलहोईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना उच्च प्रगती साधण्यास काळ अनुकुल होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे महिन्याच्यापूर्वार्धात अपेक्षित कौटुंबिक सुख समाधान व गृहसौख्य लाभेल. पण उत्तरार्धात विविध कारणांनी व समस्यांनी त्रस्त व्हाल व त्यामुळे सर्व प्रकारचे अनारोग्य होणे संभवते. जपा. काहींचे स्नेहसबंध तर काहींचे प्रेमसंबंधदृढ होतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे विकृत विचारांचा जोर होईल. त्यामुळे नको ते हातून घडण्याची शक्यता आहे. जपा. वाममार्ग धनाचा विचारही करू नका. तसेच हा राहू दाम्पत्य जीवनातही बाधा निर्माण करील. जपा. वाहनधोका संभवतो. जपा. काहीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. शिवोपासना तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====oooOooo=====